# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि–३/गु.यादी/२०१२/2955

दिनांक : - 9 OCT 2012

प्रति,

प्राचार्य/संचालक

____________________

____________________

____________________

(सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था)

**विषय :— संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करण्याबाबत...**

**संदर्भ :— मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/गुणवत्ता यादी/२०१२/१५२७, दि. ०३ ऑक्टोबर २०१२.**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक सत्र २०१२–१३ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी, एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्म,एम.ई. पदव्युत्तर पदवी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यांत येतील. व लवकरच या कार्यालयाचे वेबसाईटवर **(www.rdtenagpur.org.in)** शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मधील गुणवत्ता यादी पडताळणीचे वेळापत्रक जाहीर करण्यांत येईल. संस्थेचे प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असेल अशा सर्व एआरसी प्रमुखांकडून हिशोबासह धनाकर्ष गुणवत्ता याद्या तपासण्यापूर्वी जमा करणे बंधनकारक राहील, त्यानंतरच त्यांच्या गुणवत्ता याद्या तपासण्यांत येईल याची नोंद घ्यावी. तसेच गुणवत्ता यादी पडताळणीचे वेळी सबंधित संस्थांनी आवश्यक असणारी स्टेशनरी (जसे–कॅलकुलेटर, स्टैपलर, स्टॅपलर पीन, फ्लॅग व स्टॅम्प पॅड सोबत आणावे)

संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१२/१६२५, दि. २०.०७.२०१२ अन्वये प्रवेशित होणा–या उमेदवारांच्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्याबाबत आपणास सुचना देण्यांत आलेल्या आहेत. त्यासंदर्भाने आपल्या संस्थेची गुणवत्ता यादी **संस्था प्रमुखांनी तपासणी केल्याचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र पडताळणीवेळी आणणे अनिवार्य आहे**. आपले संस्थेस देण्यांत आलेल्या संकेतांक व पासवर्डव्दारे ऑनलाईन पध्दतीने लॉगइन करून आपले संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी पडताळणी करतांना तपासून घ्यावी. **गुणवत्ता यादीत फेरफार किंवा अनियमितता करणा–या संस्थांवर कडक कारवाई करून तसा अहवाल संचालनालयास कळविण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

संस्थेने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या शासनमान्य नियमावलीनुसार गुणवत्ता यादी पडताळणी करावी. प्रवेश नियमांचे उल्लंघन करून अथवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणा–या किंवा कट ऑफ डेट नंतर प्रवेश अपलोड करणा–या संस्थांच्या गुणवत्ता याद्या पुर्न:पडताळणी करून संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे. शासन नियमानुसार संचालनालयाव्दारे दंडात्मक कारवाईनंतर संस्थेच्या गुणवत्ता याद्या मंजूर करण्याबाबत नंतर संचालनालयास शिफारस करण्यांत येईल. या कार्यालयामार्फत संस्थेची

• गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीत आढळून आलेल्या त्रुटी गुणवत्ता यादीतील क्रमांकाचा उल्लेख करून तसे पत्र प्रवेश नियंत्रण समितीला आणि विद्यापीठास कळविण्यांत येईल. या कार्यालयामार्फत गुणवत्ता यादी मंजूरीची शिफारस करतांना त्यामध्ये केवळ जात वैधतेची त्रुटी शिल्लक असतील तर अशाच गुणवत्ता याद्या मा. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, बांद्रा (पूर्व), मुंबई या कार्यालयाकडे शिफारस करण्यांत येतील. उर्वरित त्रुटया संस्था स्तरावर/सहसंचालक स्तरावर पुर्ण करण्यांत येवून त्यांची पुर्तता केल्यानंतरच गुणवत्ता याद्या प्रवेश नियंत्रण समितीकडे सादर करण्यांत येतील. गुणवत्ता यादी मंजूरीनंतर त्यामध्ये काही नियमबाह्य प्रवेश अथवा अनियमितता झालेली आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी. **(सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची तपासणी सुची संस्था स्तरावर कार्यवाहीस सोबत जोडण्यांत येत आहे)**

**सहपत्र : वरीलप्रमाणे.**

**( गुलाबराव ठाकरे )**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. २अ) यांना माहितीकरीता मानार्थ सादर.
२) मा. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, बांद्रा(पूर्व) मुंबई यांना माहितीस सादर.